**कक्ष अधिकारी पदावरुन अवर सचिव पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः असप १२२५/प्र.क्र. १०३/प्रशा १**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२६.

**<u>आदेश</u>**

मंत्रालयीन विभागातील खालील **कक्ष अधिकारी (गट-ब (राजपत्रित), वेतनश्रेणी एस १७ - रु.४७६००-१५११००)** संवर्गातील अधिकाऱ्यांना या आदेशाच्या दिनांकापासून **अवर सचिव (गट-अ, वेतनश्रेणी एस २३ - रु.६७७००-२०८७००)** या पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | कक्ष अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | सध्याचा विभाग | अवर सचिव पदावरील पदोन्नतीनंतरचा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री. प्रशांत श्रीधर शेलार | खुला | सार्वजनिक बांधकाम विभाग | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| २. | श्री. संदेश राजाराम उतेकर | खुला | सार्वजनिक बांधकाम विभाग | वित्त विभाग |
| ३. | श्रीमती शुभांगी संजय घाग | इमाव | जलसंपदा विभाग | जलसंपदा विभाग |
| ४. | श्रीमती वैशाली अविनाश काकडे | इमाव | अल्पसंख्याक विकास विभाग (प्रतिनि - महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग) | प्रपत्र बढती महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग |
| ५. | श्रीमती ऐश्वर्या नितीन गोवेकर | खुला | महसूल व वन विभाग | राजशिष्टाचार विभाग |
| ६. | श्रीमती सीमा तुषार सावंत | खुला | सामान्य प्रशासन विभाग | सामान्य प्रशासन विभाग |
| ७. | श्रीमती मेघा देवेंद्र कांदळकर | खुला | सामान्य प्रशासन विभाग | वित्त विभाग |
| ८. | श्री. धनंजय रमेशराव पुराडउपाध्ये | खुला | अन्न, नागरी, पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (प्रतिनि - राज्य सेवा हक्क आयोग, नाशिक) | गृह विभाग |

| अ. क्र. | कक्ष अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | सध्याचा विभाग | अवर सचिव पदावरील पदोन्नतीनंतरचा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ९. | श्री. चंद्रकांत सुधाकर कातकाडे | खुला | नियोजन विभाग (प्रतिनि - राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक) | पदुम विभाग |
| १०. | श्री. समीर दिवाकर पालकर | खुला | महसूल व वन विभाग | राजशिष्टाचार विभाग |
| ११. | श्रीमती रुपाली संजोग कबरे | खुला | इतर मागास व बहुजन कल्याण विभाग | वित्त विभाग |
| १२. | श्रीमती वनिता संजय परब | खुला | सामान्य प्रशासन विभाग | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग |
| १३. | श्री. नितीन बाळकृष्ण शेळके | भज ड | कृषी व पदुम विभाग | कृषी विभाग |
| १४. | श्रीमती मनाली मिलींद सामंत | खुला | आदिवासी विकास विभाग | मराठी भाषा विभाग |
| १५. | श्रीमती सानिका संदीप माने | खुला | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग |
| १६. | श्रीमती अश्विनी अरविंद मुन | अ.जा. | महसूल व वन विभाग | राजशिष्टाचार विभाग |
| १७. | श्रीमती साक्षी पुनाजी कांदळगांवकर | खुला | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | उद्योग विभाग |
| १८. | श्रीमती आरती प्रविण पाटील | खुला | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | राजशिष्टाचार विभाग |
| १९. | श्री. संजय नारायणराव गरुडकर | इमाव | महसूल व वन विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| २०. | श्रीमती शिल्पा निनाद नातू | खुला | अन्न, नागरी, पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (प्रतिनि - मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण) | प्रपत्र बढती मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण |
| २१. | श्री. श्रीनाथ वसंत हेंद्रे | इमाव | सार्वजनिक बांधकाम विभाग | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| २२. | श्री. सुनिलसिंग शिवाजी निकम | विजाअ | सामान्य प्रशासन विभाग | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग |

२. श्रीमती वैशाली अविनाश काकडे, श्रीमती शिल्पा निनाद नातू यांना, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१

मधील नियम, ४०  परिशिष्ट-२, अट क्र.१८ नुसार अवर सचिव पदावर प्रपत्र बढती (तदर्थ पदोन्नती) देण्यात येत आहे. सदर तरतुदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा राहील.

३. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन आरक्षण-२ यांनी शासन पत्र दि. ३०.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार, सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व पदोन्नतीसंदर्भातील मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ तसेच अन्य सर्व याचिकांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. सदर अधिकाऱ्यांना अवर सचिव पदावरील **तदर्थ** पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| (अ) | ही तदर्थ पदोन्नती अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात मंत्रालयीन विभागातील अवर सचिव संवर्गातील अधिकारी प्रतिनियुक्तीवर गेल्यामुळे रिक्त झालेल्या पदांवर प्रशासकीय निकड म्हणून लोकहितास्तव देण्यात आली आहे. |
| (आ) | या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. |
| (इ) | सदर तदर्थ पदोन्नती प्रतिनियुक्तीवर बाहेर गेलेले अधिकारी/कर्मचारी रुजू होईपर्यंत किंवा पदोन्नतीच्या आदेशापासून ११ महिन्यांसाठी यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी असेल. |
| (ई) | अवर सचिव संवर्गातील प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी/कर्मचारी यांचे प्रत्यार्वतन झाल्यानंतर त्यांच्यासाठी अवर सचिव संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम अधिकारी/कर्मचारी यांना पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर तदर्थ पदोन्नत्या देण्यात येत आहेत. |
| (उ) | सदर तदर्थ पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या तसेच अन्य सर्व न्यायलयीन याचिकांच्या अधीन राहून करण्यात येत आहे. |
| (ऊ) | सदर तदर्थ पदोन्नती मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन क्र.३३१०/२०२१ व रिट पिटीशन क्र.३३११/२०२१ यामधील आय.ए.क्र.१८५४/२०२१ व १८५५/२०२१ तसेच रिट पिटीशन क्र.३३१२/२०२१ मध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| (ए) | सदर तदर्थ पदोन्नती मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथील प्रलंबित मूळ अर्ज क्र.४८८/२०१७ (श्री.किरण जाधव व इतर) मध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. |
| (ऐ) | सदर तदर्थ पदोन्नती मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथील प्रलंबित मूळ अर्ज क्र. १०६६/२०१९ (श्री. उल्हास शंकर भोईटे व इतर) मध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. |
| (ओ) | सदर तदर्थ पदोन्नती दिव्यांग आरक्षणाच्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२९.०७.२०२४ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाहीनुसार होणाऱ्या बदलाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. |

५. सदर अधिकाऱ्यांची अवर सचिव पदावरील तदर्थ पदोन्नती ही सदर अधिकाऱ्यांविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही, या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. त्यानुसार संबंधित विभागाने खातरजमा करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असल्यास या विभागास अवगत करावे.

६. अवर सचिव पदावर तदर्थ पदोन्नती दिलेल्या अधिकाऱ्यांनी हे आदेश निघाल्याच्या तारखेपासून **तीस** दिवसांमध्ये अवर सचिव पदावर रुजू होणे आवश्यक आहे. पदोन्नत अधिकाऱ्यांस पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने विहित मुदतीत कार्यमुक्त करावे.

७. संबंधित कक्ष अधिकारी यांनी अवर सचिव पदावरील तदर्थ पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दिनांक १२.०९.२०१६ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दिनांक ०१.०८.२०१९ मधील तरतूदीनुसार संबंधित अधिकाऱ्यांचे नांव सन २०२५-२६ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल आणि पुढील सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता सन २०२८-२९ च्या निवडसूचीवर अवर सचिव पदावरील तदर्थ पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

८. महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणातील तरतुदीनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे संबंधित पदोन्नत अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील.

९. पदोन्नत अधिकाऱ्यांना संबंधित विभागांनी कार्यमुक्त केल्याबाबतच्या तसेच अवर सचिव पदावर रुजू केल्याबाबतच्या आदेशांच्या प्रती या विभागास तात्काळ पाठवाव्यात.

१०. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८२४१९०२०२११०७ हा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

PRASHANT PUNDLIK BADGERI

Digitally signed by PRASHANT PUNDLIK BADGERI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=07AE22A8E7FA4047CE6FF816D85E77EEC14DB9926B325A140ACF9B28BB990786, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EC955E2D360E1FDDB6ABAC58A907419053BEECEB5DBAC48A78C89C588FF71BEF, cn=PRASHANT PUNDLIK BADGERI
Date: 2026.08.24 19:03:26 +05'30'

**( प्रशांत पुं. बडगेरी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव
४. अ.मु.स.(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, सर्व संबंधित मंत्रालयीन विभाग.
६. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, नाशिक.
७. आयुक्त, राज्य माहिती आयोग, नाशिक
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)
१०. सह/उप सचिव (आस्थापना) संबंधित मंत्रालयीन विभाग.
११. अवर सचिव(कार्यासन माहिती/कार्यासन लोदिक), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव (कार्यासन ७ अ), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अवर सचिव (कार्यासन झोपुप्र), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. संबंधित अधिकारी (विभागामार्फत).
१५. निवड नस्ती (कार्यासन प्रशा-१)